# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरातीचा मसुदा

बृहन्मुंबई महानगरपालिकेत कंत्राट तत्वावर फेलो उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबतच्या अर्हता व अटी खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | पदनाम<br>पदांची संख्या | फेलोज ( Fellows)<br>50 |
| 2 | शैक्षणिक अर्हता | 1. उमेदवार कोणत्याही शाखेतील पदवीधर ( किमान 60% गुण आवश्यक ) असावा.<br>2. मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.<br>3. हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>4. संगणक हाताळणी आणि इंटरनेटचे ज्ञान आवश्यक राहील. |
| 3 | अनुभव | 1.किमान एक वर्षाचा पूर्णवेळ कामाचा अनुभव आवश्यक राहील.<br>2.व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमांचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशिप / अप्रेंटीसशिप / आर्टीकलशिपसह एक वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.<br>3.पूर्णवेळ स्वयंरोजगार, स्वयंउद्योजकतेचा अनुभवही ग्राह्य धरण्यात येईल. अर्जदारास तसे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. |
| 4. | अपात्रता | बृहन्मुंबई महानगरपालिका फेलोशिप व मुख्यमंत्री फेलोशिपचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अर्ज करता येणार नाही. |
| 5 | वयोमर्यादा | उमेदवाराचे वय अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास किमान 21 वर्षे व कमाल 28 वर्ष असावे. |
| 6 | करार कालावधी | 12 महिने |
| 7 | शारिरीक /मानसिक स्थिती | शारिरीक /मानसिक स्थिती उत्तम असावी. |
| 8 | कंत्राट वेतन | रु. 61,500/- |
| 9 | कामाचे स्वरूप | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ज्या विभागात नियुक्ती केली असेल त्या विभागाच्या खातेप्रमुखांनी नेमून दिलेली सर्व कामे पार पाडणे. |
| 10 | अर्ज करावयाची पध्दत | ऑनलाईन अर्ज मागवून संपूर्ण भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. त्याबाबतची लिंक पुढीलप्रमाणे - https://bmc.recruitlive.in/#/login.<br>अर्ज करण्याची तारीख दि. 19/08/2026 ते दि. 31/08/2026. |
| 11 | अर्जाचे शुल्क | अर्जाचे शुल्क रु. 500/- (वस्तू आणि सेवा करासह) ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. |
| 12 | निवडीची कार्यपध्दती | प्राथमिक छाननी परिक्षा (100 गुण) ऑनलाईन पध्दतीने घेऊन प्रति पद तीन उमेदवार गुणवत्तेनुसार निवडण्यात येतील. तदनंतर उक्त उमेदवारांची मुलाखत (100 गुण ) घेऊन एकत्रित गुणवत्तेनुसार फेलो उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| 13 | नियुक्तीची कार्यपध्दती | निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पोलिस चौकशी पूर्ण झाल्यानंतर कंत्राट करार करुन नियुक्ती करण्यात येईल. |
| 14 | सामान्य अटी आणि शर्ती | 1. अर्जाची पडताळणी करताना चुकीची माहिती भरलेली आढळल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.<br>2. सदर नियुक्त्या 12 महिन्यांच्या कंत्राट कालावधीकरीता असल्याने, त्यांना महानगरपालिकेमध्ये सदर पदावर अथवा अन्य पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.<br>3. करार कालावधीतील सेवा ही निवृत्तीवेतन, बोनस, रजा प्रवास सवलत, रजा रोखीकरण किंवा अन्य कोणत्याही अधिक लाभासाठी व सेवाविषयक लाभांसाठी विचारात घेतली जाणार नाही. तसेच महागाई भत्ता, अंतरिम किंवा वेतन आयोगाचे सेवा विषयक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.<br>4. कराराच्या 12 महिन्यांच्या कालवधीत फेलोंना 8 दिवसांची किरकोळ रजा अनुज्ञेय राहील. अन्य कोणत्याही प्रकारची रजा त्यांनी उपभोगल्यास त्यानुसार मानधनातून कपात करण्यात येईल.<br>5. फेलोंच्या कराराच्या कालावधीत असमाधानकारक कामगिरी किंवा गैरशिस्तीच्या कारणामुंळे कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांचा फेलो म्हणून नियुक्तीचा करार समाप्त करण्यात येईल.<br>6. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई मध्ये राहण्याची सोय त्याने स्वत: करणे अपेक्षित आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सदर सोय करण्यात येणार नाही.<br>7. वरील अटी / शर्तीमध्ये बदल / वाढ करण्यात आल्यास, त्या फेलोंवर बंधनकारक राहतील. |

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) | अतिरिक्त आयुक्त (शहर) | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | महानगरपालिका आयुक्त |